MHSN050018822022

**<u>नियमित दिवाणी दावा क्र.२९९/२०२२ मधील नि.क्र.७० खालील आदेश</u>**

(बाळासाहेब मधाळे वि. विशाल मधाळे, वगैरे)

प्रस्तूतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेशक्रम VI, नियम १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांचे अर्जातील कथन असे की, वादी यांनी सदरकामी दावा दुरुस्त प्रत दाखल केली आहे. परंतू, सदर दुरुस्त वादपत्रात नजरचुकीने दाव्याच्या टायटल मध्ये तसेच दावेची आकारणी व दावेचे कारण यामध्ये काही मजकूर नमूद करणेचे नजरचुकीने राहून गेले आहे. त्यामुळे वादी यांनी टायटल पेजवर, 'दावा – साठेखतावरुन खरेदीपत्र होऊन मिळणेसाठी, स्पेसिफीक रिलीफ ॲक्ट नुसार तसेच निरंतर मनाईसाठी व डिक्लरेशनसाठी' तसेच 'दावा विषयाची किंमत रक्कम रु.१४,५०,०००+१०००+१०००/–' या मजकूरास काट देऊन त्याठिकाणी "दावा–साठेखतावरुन खरेदीपत्र होऊन मिळण्यासाठी, स्पेसिफीक रिलीफ ॲक्ट नुसार तसेच निरंतर मनाईसाठी व डिक्लरेशनसाठी व वादींनी दावा मिळकतीमध्ये केलेल्या बांधकामासाठी खर्चाची रक्कम रु.१२,००,०००/– वसूलीकरता" तसेच "दावा विषयाची किंमत रु.३,१०,०००+१२,००,०००+१०००+१०००" अशी दुरुस्ती करणेस त्याचप्रमाणे वादपत्रातील कलम ११ मधील संपुर्ण मजकूरास काट देऊन प्रस्तूत अर्जात नमूद केल्याप्रमाणे दावेस कारण हा मजकूर आणि कलम १४ मधील संपुर्ण मजकूरास काट देऊन त्याठिकाणी प्रस्तूत अर्जात नमूद केल्याप्रमाणे दाव्याची आकारणीबाबतचा मजकूर नमूद करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्ती

केल्यास दाव्याच्या मूळ विषयामध्ये कोणताही फेरबदल होत नाही तसेच सदर दुरुस्ती ही किरकोळ स्वरुपाची आहे. सबब, सदर दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी, अशी विनंती वादी यांनी केली आहे.

**०३.** प्रतिवादींनी प्रस्तूत अर्ज नि.क्र.७० वरच त्यांचे म्हणणे दाखल करुन त्यास विरोध दर्शवला आहे. त्यांनी असे कथन केले आहे प्रस्तूत दाव्यात 'दावेस कारण' नमूद असल्याने सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा, अशी विनंती त्यांनी याद्वारे केली आहे.

**०४.** प्रस्तूत अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांच्या विद्वान विधिज्ञांनी सदरच्या दुरुस्तीने दाव्याचे कोणतेही स्वरुप बदलणार नाही, त्यामुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही, असा युक्तीवाद करुन, सदरचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली. याउलट प्रतिवादी यांच्या विद्वान विधिज्ञांनी युक्तीवादादरम्यान प्रस्तूतचा अर्जातील कथने नाकारुन अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

**०५.** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांनी प्रस्तूतचा दावा हा प्रतिवादींविरुध्द कराराचे विनिर्दिष्ट पालन होऊन मिळण्याकरिता, निरंतर ताकीद व जाहीर ज्ञापनाकरिता दाखल केला आहे. प्रस्तूत अर्जातील कथनांचे अवलोकन केले असता, वादी यांनी दाव्यात सूचवलेली दुरुस्ती ही दावा विषयाची किंमत, दावेस कारण व दाव्याची आकारणी यासंदर्भात आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की वादी यांनी यापुर्वी नि.क्र.६४ अन्वये दुरुस्तीचा अर्ज दाखल केला होता व सदरचा अर्ज न्यायालयाने मंजूर केलेनंतर वादी यांनी वादपत्रात संबंधीत दुरुस्ती केलेची दिसून येत आहे. परंतू, तद्नंतर वादी यांनी पुन्हा प्रस्तूत अर्जामध्ये दाव्यात प्रस्तावित दुरुस्ती सुचवली आहे. सदर संकल्पीत दुरुस्तीस

प्रतिवादींतर्फे कोणताही ठोस आक्षेप नोंदविण्यात आला नाही. महत्वाचे येथे नमूद करावे वाटते की, दाव्याची संपरीक्षा सुरु होण्यापुर्वी दुरुस्तीचे अर्ज उदारपणे मंजूर करणे अपेक्षीत असते. प्रस्तूत दाव्यात अद्याप मुद्दे निश्चीत झालेले नाहीत, तसेच दाव्याची संपरीक्षा देखील सुरु झालेली नाही. सदरची दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्याचे मूळ स्वरुप बदलणार नाही. केवळ प्रस्तूतची दुरुस्ती मंजूर केली म्हणजे ती शाबीत झाली असे होत नाही. याउपर, दाव्यातील कथने शाबीत करण्याचा भार हा सदर कथन करणाऱ्या पक्षकारांवरच असतो. सबब, उपरोक्त चर्चेवरुन प्रस्तूतचा अर्ज मंजूर करणे न्यायाचे होणार आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :-

## <u>आ दे श</u>

१. प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी संबंधीत दुरुस्ती सदर आदेश तारखेपासून १४ दिवसांचे आत करुन, दावा दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

Digitally signed by THAKUR PRADEEPSINGH
Date: 2024.10.25 17:35:58 +0530

इस्लामपूर. **(प्रदिपसिंह पृ. ठाकूर)**

दिनांक २५/१०/२०२४. ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, इस्लामपूर.

**- : <u>C E R T I F I C A T E</u> : -**

I affirm that the contents of this P.D.F. file, order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Sagar Anil Kate |
| Court Name | :- | 3rd Jt. Civil Judge Jr. Dn., Islampur. |
| Date of decision | :- | 25/10/2024. |
| Order signed by PO. on | :- | 25/10/2024. |
| Order uploaded on | :- | 25/10/2024. |